<u>साक्षीदार क्र. १ यांचा  उलटतपास विधिज्ञ श्री.एम.के.मलगे यांच्या मार्फत शपथेवर सुरू ः-</u>

मी माझ्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यावर चेक वटण्यासाठी भरले होते. माझ्या बँकेने आरोपीच्या बँकेडे चेक वटण्यासाठी पाठविल्याचा कागदोपत्री पुरावा या केस कामी दाखल केला नाही. नि.३० च्या चेकवर आरोपीच्या बँकेकडे पाठविल्याबाबतचा शेरा नाही. बँक मॅनेजर यांनी ६५(बी) प्रमाणे दाखला मला दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, चेक न वटता परत आला याबद्दलचा कोणताही पुरावा माझ्याकडे नाही. राजेश जळकोटकर व बबन नरसिंग बिरादार हे दोघे जण माझे मीत्र होय. हे म्हणणे बरोबर आहे की, ही केस प्रलंबित असतना ब-याच वेळा माझ्या सोबत आलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची माझी कसलीही ओळख नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.३१ वरील मेमो माझ्या व्यवहाराशी संबधीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, व्यंकटेश शामराव कामा हे माझे नाव नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आरोपीला हात उसणे देण्याची ऐपत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी माझ्या कडून हात उसने पैसे घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणातील चेक आरोपी यांनी मला दिलेला नाही. दि. २८.०२.२०२६ ला आरोपीने ग्रामीण पोलिस स्टेशन, उदगीर यांना माझ्या नावाचा तक्रार अर्ज दिल्याचे माझ्या माहितीत नाही. आरोपी यांनी जळकोटकर यांच्या कडून पन्नास हजार रुपये उधार घेतल्याचे माझ्या माहितीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, जळकोटकर यांनी आरोपीचा चेक चोरुन मला दिला त्या आधारे मी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदार यांच्या संगनमत करुन मी बनावट केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.04.08 16:55:12 +0530

दिनांकः- ०८.०४.२०२६ न्यायदंडाधिकारी प्र.व.

उदगीर (न्यायालय क्रं. १), उदगीर